ISBN NO. - 978-93-85162-31-2

**Third UGC Sponsored**


**TWO DAYS INTERDISCIPLINARY / INTERNATIONAL CONFERENCE**

**On**

# “GANDHISM : Past, Present and Future”

**On**

**03rd & 04th February 2**



GANDHI STUDY CENTER

LEARN FROM THE LEGEND

NEW ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, WARDHA - 442001

**Organized by**

## GANDHI STUDY CENTRE

New Arts, Commerce & Science College,
Wardha, Maharashtra (India) – 442001

Scanned by CamScanner

## INDEX


| Sr. No. | Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | प्रा. डॉ. अभिजीत वेरूळकर | ग्राम स्वराज्य | 1 |
| 2 | जयश्री पुं. कांबळे | भारतीय महिला आणी गांधीजी | 2 |
| 3 | आशीष दहाले | महात्मा गांधी : असहकार चळवळीचे प्रणेते | 5 |
| 4 | प्रा डॉ.अषोक बी.कंद्रे. | मोहनदास ते महात्मा | 8 |
| 5 | प्रा. अविनाश ब. अवचट | 'महात्मा गांधीजींचे हरिजनोद्धार विषयक विचार आणि कार्य' | 11 |
| 6 | डॉ. अतुल म. देशमुख | महात्मा काय करिल एकला | 13 |
| 7 | डॉ. सी. डी. पाखरे | महात्मा गांधीजींची धर्मसंकल्पना | 15 |
| 8 | प्रा. दिपक एन. काळे | महात्मा गांधीजीच्या विचारातुन गोसेवा आणि निसर्गोपचार एक अभ्यास | 17 |
| 9 | प्रा. डॉ. उल्हास रामजी राठोड | 'महात्मा गांधी 'सत्य, अहिंसा व असहकार आंदोलन' | 20 |
| 10 | प्रा. कोकीळा गावंडे | सविनय कायदेभंग चळवळीत महात्मा गांधीजींचे योगदान | 27 |
| 11 | डॉ. महेन्द्र पांडुरंगजी गावंडे | गांधीजींच्या विचारातून सत्य, अहिंसा व सत्याग्रह | 29 |
| 12 | नरेश डी. कवाडे | राष्ट्रीय आंदोलनाच्या विशेष संदर्भात गांधीजींचा-जमनालाल बजाज परिवारांशी झालेला निवड पत्रसंवाद | 34 |
| 13 | प्रा. प्रतिभा उरसळ | महात्मा गांधींचे अध्यात्मिक विचार | 39 |
| 14 | डॉ.सौ.पुष्पा सुभाष तायडे | अस्पृश्यता निवारणाविषयी महात्मा गांधीजींचे विचार | 43 |
| 15 | R. B. Lakshate | महात्मा गांधीजीच्या सामाजीक न्याय व सर्वसमावेषक विकास दृष्टिकोनाचा अभ्यास | 47 |
| 16 | प्रा.शहाणे आर.पी. | ।। महात्मा गांधीचे अष्टपैलु तत्तवज्ञान ।। | 50 |
| 17 | प्रा. रमेश नरसिंग थोरात, | महात्मा गांधीजींचे सर्वोदयी तत्त्वज्ञान | 54 |
| 18 | सहा.प्रा.बने रेखा रामनाथ | गांधी विचार तथा महिला राजकारण | 58 |
| 19 | प्रा.डॉ. देशपांडे एस.पी. | "सत्य व अहिंसा" या विचारात महात्मा गांधीजींचे यो दान | 60 |
| 20 | संजय पटेकर | महात्मा गांधी धर्म आणी राजकारण | 63 |
| 21 | प्रा.संजय टंगमुंगे | भारतीय स्वातंत्र आणि महात्मा गांधी–एक समालोचन | 65 |
| 22 | शेख फि. जाफर | गांधीजीची समाजातील सांप्रदायिकेची सदभावना | 67 |
| 23 | प्रा. डॉ. बसवेश्वर पांढागळे | महात्मा गांधींचे आर्थविषयक विचार | 70 |
| 24 | प्रा. डॉ. चंद्रशेखर गिल्ते | महात्मा गांधींची रामराज्य व ग्रामस्वराज्याची संकल्पना | 73 |
| 25 | प्रा. गोपीचंद के. चव्हाण | गांधीजींच्या सर्व कल्याणकारी जीवनपध्दती | 77 |
| 26 | प्रा. किशोर बी.मेंढे | गांधी आणि खादी | 80 |
| 27 | Mundhe | निढळाच्या घामाची भाकरी | 84 |
| 28 | **प्रा. विनोद संभाजी सोनवणे** | **"महात्मा गांधी व लिओ टॉलस्टॉय : एक ऐतिहासिक अभ्यास"** | 86 |
| 29 | प्रा. योगेश करवाडे | गांधीजींची असहकार चळवळ | 92 |
| 30 | प्रा. भोज छाया भास्कर | **महात्मा गांधी आणि असहकार चळवळ** | 94 |
| 31 | डॉ.सौ. पिनाटे किरण प्रल्हादराव | सद्यस्थितीत गांधी विचारांचे महत्व | 98 |
| 32 | डॉ. राखी मंगेश जाधव | महात्मा गांधींचे स्त्री विषयक विचार | 100 |
| 33 | डॉ. निलेश देशमुख | मंगल प्रभात एकदशाव्रत | 102 |
| 34 | डॉ. प्रशांत सुनिल शेळके | स्त्रीवाद आणि गांधी विचार | 107 |
| 35 | डॉ. आर. एस. डाखोरे | स्वच्छता आणि आरोग्य **महात्मा गांधी** | 110 |


Scanned by CamScanner

8 म. गांधीचे संकलित वाङमय खंड 20, प्रकाशक – महात्मा गांधी वाङमय भाषांतर समिती, महाराष्ट्र सरकार मुंबई–1, 1968 पृ. क्र. 322–323

9 म. गांधीचे संकलित वाङमय खंड 20, प्रकाशक – महात्मा गांधी वाङमय भाषांतर समिती, महाराष्ट्र सरकार मुंबई–1, 1968 पृ. क्र. 609–611

# महात्मा गांधीच्या सामाजिक न्याय व सर्वसमावेशक विकास दृष्टिकोनाचा अभ्यास

**R. B. Lakshate**

**प्रस्तावना :**

सामाजिक न्याय व सर्वसमावेशक विकासाच्या उपयोगितेचे मुल्य उदारमतवाद, बाजाराभिमुख व जागतिकीकरणाच्या युगात वाढत आहे. पुंजीवाद, उदारमतवाद व समाजवादी विकासाचा केंद्रबिंदू व्यक्ति नाही. विकासाच्या प्रवासात व्यक्ति आज गुरफटला जात आहे. समाज अस्ताव्यस्त झाला आहे. व्यक्तिच्या विचार करण्याच्या पध्दती व विचार अतिभौतिकवादी, संकुचित धोरणामुळे व्यक्ति, शेतकरी, कामगार, मध्यमवर्ग आणि असंघटित, अशासकीय कर्मचारी वर्ग विखुरला आहे. त्यांचे जीवन फक्त अन्न, वस्त्र आणि निवाऱ्याचा प्रश्न सोडवण्यातच गुरफटले आहे. तर भांडवलवादी शेतकरी, कामगार आणि मध्यमवर्गाला लुटून व नैसर्गिक साधनसंपत्तीचा गैरमार्गाने अनैतिक वापर करुन प्रगती करत आहेत. परिणामतः गरीब अधिक गरीब बनत आहे. शासन कोणत्याही राजकीय पक्षाचे असो कॉर्पोरेट घराणेशाहीचे हस्तक म्हणून काम करत आहे. नौकरशाह, राजकारणी त्यांचे बाहुले बनले. शासन भांडवलवाद्यासोबत मिळून लोकांना फक्त त्यांनी मरु नये व जगु नये एवढेच देते. अशा स्थितीत सामाजिक न्याय व सर्वसमावेशक विकासाच्या गांधीवादी दृष्टिकोणाबाबत विचार करणे आवश्यक वाटल्यामुळे तसा प्रयत्न येथे करण्यात आला.

**संशोधनात्मक आराखडा :**

वर्तमान चंगळवादी युगातील प्रत्येक प्रश्नाकडे पाहण्याचा गांधीवादी दृष्टिकोण विकसित होत आहे. त्याचे अनुकरण करुन सामाजिक न्याय व सर्वसमावेशक विकासाबाबतच्या गांधीवादी दृष्टिकोनाला समजुन घेण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे. सामाजिक न्याय व सर्वसमावेशक विकासाबाबत गांधीवादी दृष्टिकोन वर्तमानात कालबाह्य वाटत असला तरी तोच शाश्वत आहे या गृहितकास प्रमाण मानले. या गृहितकाची सत्यता पडताळण्यासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक अभ्यास पध्दतीचा आधार घेतला आहे.

वर्तमानकाळातील भोगवादी समाज व भांडवली शासनात विकासाची संकल्पना संकुचित बनली. विकासाचा आधार औद्योगिकरण, शहरीकरण आणि आर्थिक हाच राहीला आहे. वास्तवतेत विकास म्हणजे सर्वांगिण विकास आहे. ज्यात गरिबातील गरीब आणि असहाय्य व्यक्तीला ही विकसित होण्याची सर्व संधी मिळेल. परंतु असे न झाल्यामुळे आज जगातील सर्व श्रीमंत व्यक्तीत आमच्या देशाचे कांही उद्योगपती सहभागी आहेत. तर आजही भारतात जवळपास २६% लोक दारिद्र्यरेषेखालील आहेत. आजही सामान्य माणसाला प्राथमिक सुविधा मिळत नाहीत. त्यासाठी आवश्यकता आहे एक सर्वमान्य विकासाची ज्यात आम आदमीपण विकासाच्या प्रक्रियेत सहभागी होईल. वास्तवतेत त्याच राष्ट्राला विकसित म्हणतात जेथे प्रत्येक व्यक्ति आपल्या मुलभुत गरजांना पूर्ण करु शकेल.

स्वातंत्र्यानंतर भारताचा विकास झाला हे सत्य आहे. परंतू हे ही सत्य आहे की, आज येथे दोन प्रकारचा भारत निर्माण झाला. एका भारतात महानगराचा महापूर आहे. जेथे सर्व सुविधांचे भरपूर साम्राज्य आहे. प्रती व्यक्ति उत्पन्न राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा अधिक आहे. पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण आणि इतर मुलभुत सुविधा विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत. तर दुसऱ्या भारतात वीज नाही पाणी नाही, रस्ता नाही तर इतर अन्य प्रकारच्या कोणत्याही सुविधा नाहीत. या ठिकाणचा विकास झालाच नाही. अशात आज गरज आहे विकासाच्या विभिन्न सिध्दांत व व्यावहारिक घटकावर गहन चिंतन करुन प्रतिकार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याची.



Scanned by CamScanner

भारतात स्वातंत्र्यापासून ते आजपर्यंत जेंव्हा-जेंव्हा विकासाबाबत चर्चा झाली तेंव्हा-तेंव्हा पश्चिमेकडील युरोपीय देशांना रोल मॉडेल समजुन स्विकारण्यात आले. स्वातंत्र्यानंतर रशियन साम्यवादी मॉडेल प्रमाण मानुन वाटचाल करण्यात आली. तर आज अमेरिकन मॉडेल प्रमाण मानुन विकासाचे गणित आखले जाते. महात्मा गौतम बुध्दापासून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांपर्यंतच्या महामानवांनी मानवी विकासाबाबतची मांडणी केली. यात प्रामुख्याने उल्लेख करावासा वाटतो महात्मा गांधीचा कारण महात्मा गांधीचे विकासाचे मॉडेल या देशांची संस्कृती व जमीनीशी जुडलेले आहे. जगातील प्रत्येक देशाला विकास धोरणाची व चर्चा करताना आपल्या देशाची उपलब्धता व गरज लक्षात घेवून करावे लागेल. तेंव्हाच खऱ्या अर्थाने तो देश आपला विकास योग्यप्रकारे करु शकतो. भारत एक असा देश आहे जेथे भौगोलिक, सामाजिक, भाषीक विभिन्नता आहे. या भिन्नतेमुळेच विकेंद्रीकरण, स्वानिकीकरणाच्या संकल्पनेस समाज व्यवस्थेचे सातत्य व गतिशीलतेसाठी समजुन घेण्यात आले. या सर्वांत भारताचे विशेषत्व प्रकर्षाने जाणवते. ब्रिटीशकाळात भारताच्या या सर्व विशेषतांना वेळोवेळी नष्ट करणे आणि बदलण्याचे प्रयत्न झाले. आजही असे प्रयत्न जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण आणि बाजाराभिमुखतेच्या रुपाने आमच्या समोर येत आहेत. आम्हाला त्यापासुन सावधानता बाळगण्याची गरज आहे.

सामाजिक, आर्थिक व राजकीय विकासाला विकास म्हणतात. स्वातंत्र्यानंतर लोकांना राजकीय स्वातंत्र्य मिळाले. परंतु सामाजिक आणि आर्थिक न्याय आजही मिळाला नाही. शासन वेळोवेळी अनेक प्रयत्न करत आहे. परंतु त्याचे अचूक समाधान मिळत नाही. कारण आहे की, आजही समाज जात, वर्ग, धर्म व प्रदेशाच्या आधारावर विभागला आहे. राजकीय पक्ष त्याचा फायदा घेवून आपले हित जोपासतात. आम्हाला भारतासारख्या देशात त्याच्याच संदर्भाने विकासाची नवीन संकल्पना व योजना बनवण्याची आवश्यकता आहे. ज्यामुळे प्रत्येक नागरिकाला प्राथमिक शिक्षण, प्राथमिक आरोग्य व त्याच्या अन्य मुलभुत गरजांची पुर्तता होईल. आज व्यक्ति विशेषत्वाने दलित व महिला आणि मागास लोकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे शासनाची प्राथमिकता असावी.

खेडी आणि शहराच्या विकासाशी संबंधित वर्तमानातील सर्वच क्षेत्रातील आकडेवारी तपासता त्यातील अंतर दिवसेंदिवस वाढत आहे. शासनाच्या अनेक योजना शहरांना केंद्रबिंदू मानुन बनवण्यात आल्या. मागील ७० वर्षांचा अनुभव हे दर्शवितो की, भारतातील महानगरांची संख्या वाढली. ग्रामीण आणि लहान शहरांचे महानगरात रुपांतर झाले. त्याचा दुष्परिणाम महानगरांवर पडत आहे. यातुन हा निष्कर्ष काढला जातो की, विकासाची वर्तमान संकल्पना व्यक्तिपूरक नाही. त्यामुळे सर्व वर्गाच्या हितास केंद्रीत करता येत नाही. समाजात कोठे ना कोठे समरसतेचा अभाव आहे. त्यामुळेच दहशतवाद, संप्रदायवाद, जातिवाद व सांप्रदायिकतेसारख्या घटना वाढत आहेत. गांधीवादी दृष्टिकोनातून विकास म्हणजे व्यक्तिचा सर्वांगिण विकास होय. ज्यात सामाजिक न्याय व सर्वसमावेशक विकासास केंद्रित करुन व्यक्ति, समाज व राष्ट्रातून सर्व प्रकारचे शोषण व अन्यायाचा अंत करणे. यात सर्व क्रियांचा केंद्रबिंदू व्यक्ति असतो. खेड्यांच्या विकासातुनच राष्ट्राचा विकास होतो. आज खेड्यांना शहराशी जोडणे आवश्यक आहे. ज्या सुविधा शहरात आहेत. त्या खेड्यातही असाव्यात. शहर खेड्याचे शोषण करतात. परंतु वास्तवतेत ते परस्परपुरक असावेत. आजही भारतातील बऱ्याच गावात कोणत्याही सुविधा उपलब्ध नाहीत. खेड्याच्या विकासाशिवाय सामाजिक न्याय व सर्वसमावेशक विकास शक्य नाही. ग्रामीण विकास म्हणजे फक्त शेती विकास नाही. तर तो सर्वांगिण ग्रामीण विकासाशी संबंधित आहे. म्हणजेच मानव संसाधानांचे सर्व घटकांचा विकास होय.

भारत हा खेड्यांचा देश आहे. ग्रामीण भागातील विशाल समस्यांना पाहता भारतासह विकसनशील देशांनी विकास कार्यक्रमांची आखणी केली. ज्यामुळे सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रात अनेक संस्थांचा जन्म झाला. अशा संस्थांच्या निर्मितीत अधिक भर देण्यात आला. यामागे कारण आहे की, विकासाचे कार्यक्रम फक्त शासकीय यंत्रणेमार्फत चालवले नसून त्यात सक्रिय व प्रभावपूर्णरित्या लोकांच्या भागीदारीस ठरवणे गरजेचे होते. याशिवाय राजकीय विकास व सामाजिक न्यायासाठी प्रभावशाली संस्थांची स्थापना करणे आवश्यक होते. अशात स्थानिक संस्थांचे अस्तित्व गरजेचे होते जेणकरुन ग्रामीण विकासाला गती मिळेल.

सामाजिक न्याय व सर्वसमावेशक विकासात भागीदारीची विशेष भूमिका असते. ग्रामीण भागात उपलब्ध सर्व संसाधन म्हणजेच कौशल्य, बचत, जमीन, जंगल, पशु, संपदा आणि पाण्याचे संचरण व प्रभावशाली वापरासाठी गरजेचे आहे.



Scanned by CamScanner

योग्य शासकीय मदतीशिवाय व्यापक ग्रामीण विकासासाठी ग्रामीण भागात अधिकतम विकास संपदाचे असणे आवश्यक आहे. जंगल, जमीन आणि जल यावर लोकांचा हक्क गरजेचा आहे.

स्वातंत्र्या अगोदर भारतात दलित-मागास व महिलांची भागीदारी सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात नगण्य होतो. गांधी, नेहरु व आंबेडकरांच्या प्रयत्नांमुळे आज स्थिति बदलली आहे. आज स्त्रिया राजकारण व इतर क्षेत्रात पूर्वीच्या तुलनेत सक्षम आहेत. उदा : उत्तरप्रदेश सारख्या प्रदेशात मायावतींचे मुख्यमंत्री बनणे. पंचायती राज संस्थांत बिहार, राजस्थान आणि मध्यप्रदेशात ५०% जागा महिलांसाठी आरक्षित ठेवणे. आज बिहारमध्ये महिलांची पंचायत राज संस्थेतील भागीदारी वाढत असल्यामुळे तेथील वातावरण बदलले. ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीत समाविष्ट सर्व विषय जर पंचायतीराज संस्थांना सोपवले तर वास्तवतेत भारतात सामाजिक न्याय व सर्वसमावेशक विकास तीव्र गतीने जाणवेल. भारताचे चित्र बदलेल. राजकारणी आणि नौकरवर्ग असे होवू देत नाहीत. कारण यामुळे त्यांचे वर्चस्व नष्ट होते.

सामाजिक न्याय व सर्वसमावेशक विकास ही काळाची मागणी आहे. शासनास सर्व राजकीय पक्षांना आणि कॉर्पोरेट घराण्यांना मिळून या दिशेने काम करावे लागेल. अन्यथा भारत संपूर्णतः दहशतवाद आणि नक्षलवादाच्या खाईत लोटला जाईल. त्यासाठी जलद व सावधपूर्वक उपाय करावे लागतील. शासन, राजकीय पक्ष आणि कॉर्पोरेट घराण्यांनी जनतेच्या भावनेस समजून घ्यावे व एकत्रितपणे आम जनतेच्या विकासासाठी कार्य करावे. गांधीच्या मते, राष्ट्र म्हणजे जनता होय. शासनाचे कर्तव्य नागरिकास सुरक्षा प्रदान करणे, शिक्षण देणे, प्राथमिक आरोग्य आणि मुलभुत सुविधा प्राप्त कराव्यात. भारतातील गरीब, दलित व महिलांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे शोषण केल्यामुळे श्रीमंत अधिक श्रीमंत बनले. कोणी व्यक्ती मेहनत करुन श्रीमंत बनत नसून तो गरीब जनतेच्या संसाधनास लुटू बनतो. सामाजिक न्याय व सर्वसमावेशक विकासासाठी हे आवश्यक आहे की, विकासाचे केंद्र फक्त दलित-उपेक्षित असावे मग ते कोणत्याही जातीचे असोत.

सामाजिक न्याय व सर्वसमावेशक विकासाच्या गांधीवादी दृष्टीकोणाला समजुन घेण्यासाठी खालील बाबींवर प्रकाश टाकावा लागेल. खादीचा वापर, ग्राम उद्योगांचा विकास, सामाजिक-आर्थिक समता, समान दर्जा आणि मुलभुत शिक्षणास प्राधान्य ई. गांधी लोकशाहीवादी होते. ते प्रत्येक खेड्यास एका गणराज्यांत रुपांतरीत करु इच्छित होते. जे आपल्या गरजांसाठी आपल्या शेजाऱ्यांवर अवलंबून नसतील. तरीही परस्परावलंबितेचा संबंध टिकून राहील. त्यांचे ध्येय एक अशा अहिंसक संस्कृति व सहाय्यतेची निर्मिती करणे होते जे स्वावलंबी होते. आधुनिक विकासामुळे आज व्यक्ति स्वाभिमान, नैतिकता आणि राष्ट्रप्रेम गौण बनले. नैतिकता आणि स्वाभिमानाशिवाय मनुष्य वास्तवतेत मनुष्य नाही. त्याचप्रमाणे सामाजिक न्याय व सर्वसमावेशक विकासाशिवाय कोणतेही राष्ट्र आपला विकास करु शकत नाही. बेरोजगारी, कुपोषण, भुकबळी यांना जात नसते. परंतू त्यांना जातिचे रुप देण्यात आले. संपूर्ण भारतात एकच मापदंड असावे. बेकारी व गरीबी हे फक्त दलितच नसतात तर इतर वर्गातील लोकही असतात. जेंव्हा आम्ही सामाजिक न्याय व विकासाबाबत चर्चा करतो. तेंव्हा सर्वचजण सामाजिक विकासाची अपेक्षा करतात. शासनाने दलित व मागासवर्गाला पुढे नेण्यासाठी आरक्षण दिले. जे आवश्यक होते परंतू ज्यांनी एकदा आरक्षणाचा फायदा घेतला ते आता विकसित बनले. त्यांनी पुन्हा आरक्षणाचे फायदे आपल्या मुलांना मिळून देणे. सामाजिक न्याय व सर्वसमावेशक विकासाच्या मुलभुत सिध्दांताविरुध्द आहे. यावर शासन आणि समाज दोघांनी विचार करावा. अन्यथा एकवेळ येईल की, सर्वच जाति आरक्षणाची मागणी करतील. स्वावलंबनास वाढवणारी शिक्षण प्रणाली स्विकारावी. आज आमची शिक्षण प्रणाली सामाजिक न्याय व सर्वसमावेशक विकास सिध्दांताच्या विरुध्द आहे. संपूर्ण भारतात केंद्रीय विश्वविद्यालय, खाजगी शाळा आणि महाविद्यालय सर्व प्रकारच्या आधुनिक सुविधा आहेत. तर दुसरीकडे याच भारतात अशा शाळा आणि कॉलेज आहेत. ज्यात कमीत कमी मुलभुत सुविधा नाहीत. परिणामतः दोन प्रकारचे विद्यार्थी तयार होते आहेत. एक ज्यांना विषय व आधुनिक तंत्रज्ञान या दोन्हीचा अभ्यास व ज्ञान आहे. तर दुसरीकडे ज्यांना पदवी मिळत आहे. परंतू ज्ञान व तंत्रज्ञान दोन्हीं अभाव आहे. यासाठी भारताची शिक्षण व्यवस्था दोषी आहे. राजकारणी, नौकरशाह व अन्य लोकांची ही इच्छा नाही की समाजातील मागासवर्ग सशक्त व्हावा. न्यायपालिका, कार्यपालिकेत दलित व महिलांची संख्या आजही कमी आहे. फक्त राजकीय क्षेत्रात आरक्षण आणि जातिय समीकरणामुळे त्यांची संख्या कमी आहे. तरीही अति मागासवर्गास आज कांहीच मिळत नाही.



Scanned by CamScanner

भारतात सामाजिक न्याय व सर्वसमावेशक विकासाचे मापदंड भारतातील खेड्यांची प्रगती व समृध्दी आहे. महात्मा गांधी म्हणत खेड्याकडे चला. याचा अर्थ आदिम बनणे नसून अस्तित्वाच्या लढाईत स्वतःला टिकवून ठेवण्याचा मार्ग आहे. आपल्या वंशाला जिवंत ठेवण्याचा एकमात्र मार्ग आहे. गांधींनी अधिकतम लोकांसाठी सन्मानित जीवनाची एक सक्षम फायदेशीर व सर्वाधिक आश्वासनदाई मार्गाचे प्रतिपादक केले. ज्यात प्रत्येक व्यक्तिला स्वाभिमानासोबत जीवन जगण्याचा अधिकार असतो. व्यक्ति व्यक्तिला जोडून त्यास सशक्त बनवतो. भारत ही कर्मभुमि आहे. भोगभुमि नाही. स्वातंत्र्यांनतर महात्मा गांधीची स्वराज्याची संकल्पना अनेक क्षेत्रात साकार झाली. स्त्री समता आणि प्रौढ मताधिकाराविषयी गांधी म्हणत स्वराज्य म्हणजे लोकसहमति नुसार होणारे शासन. लोकसहमती देशातील प्रौढ लोकांच्या साह्याने व्हावी मग ते स्त्री असो किंवा पुरुष गांधीच्या स्वराज्य किंवा विकास संकल्पनेत कोणाची उपेक्षा किंवा शोषणास स्थान नव्हते. राजकारणी, नौकरशाह आणि भांडवलदार वर्ग स्वार्थ, क्रोध, गर्व, वासना, ईर्षा या गुणांना प्राधान्य देतात. विकसित आणि अविकसित लोकांच्या जीवनशैलींना बदलणे आवश्यक आहे. आधुनिक जीवन अधिकतम जटिल बनले. जटिलता मनुष्याच्या दु:खाची देणगी आहे. भारतांत सर्वसमावेशक आणि सामाजिक न्यायासाठी धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थात समन्वय ठेवण्याची आवश्यकता आहे.

भारताचे मुख्य केंद्र खेडे आहे. जोपर्यंत त्याची सुधारणा, पुन:निर्माण होत नाही. भारताला विनाशापासून वाचावयाचे असेल तर शेवटच्या घटकापासून सुरु करावे लागेल. जर शेवटचा भाग नासका असेल तर वरच्या आणि मधल्या भागावर केलेले काम कोसळुन पडेल. विकासाच्या संदर्भाने शहर खेड्यातील प्रतिरोध मुख्य समस्या आहे.

खेड्याचे शोषण म्हणजे हिंसा आहे. गरज आहे एका प्रकाशमय मार्गाची जो अंधकाराकडून प्रकाशाकडे, अन्यायाकडून सन्मान व विशानाऐवजी विकासाकडे घेवून जाईल. जेंव्हा आपण कोणतेही काम हाती घेवू तेंव्हा विचार करावा की, त्या कामामुळे सर्वांत गरीब आणि कमकुवत व्यक्तिला काय फायदा होईल ? जर आम्ही स्वराज्यासमान व्यापक ध्येयास प्राप्त करणे आणि सर्वसमावेशक विकास साधु इच्छितो तर आम्हास गांधीच्या या संदेशापासून आपल्या जीवनाचा आदर्श बनवावा लागेल. तसेच धोरण निर्धारक, राजकारणी आणि धोरणांची अंमलबजावणी करणाऱ्यांनी गांधीच्या मुलभूत संकल्पनेस समजुन स्विकृत करावे लागेल. तेंव्हाच आम्ही शक्तीशाली, विकसित व सर्वश्रेष्ठ भारताचे निर्माण करु शकतो. नैतिकता आणि संसाधन प्रयोगात आत्म सन्मान, अनुशासीत विकास आणि सामाजिक न्यायाची सर्वोच्च परिक्षा आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१) मूल्यव्यवस्था : गांधीविचार - संपादक डॉ.पंजाब चव्हाण, निर्मल प्रकाशन, नांदेड.

२) Relevance of Gandhian Thoughts Editor, Dr.Vasant Sanap,

३) Be the change you want to see in the world Mahatma Gandhi, Editor Dr.Prashant R.Kadave-२०१६-January.

४) गांधी, नेहरु, आंबेडकर : सामाजिक न्याय एवं राजनीति, कांता मिना व हेमराज मिना, अदि पब्लिकेशन जयपूर-२०११.

# ।। महात्मा गांधीचे अष्टपैलु तत्तवज्ञान ।।

प्रा.शहाणे आर.पी.
(सहाय्यक प्राध्यापक) राज्यषास्त्र विभाग
मोबाईल : 9623801501
कै.लक्ष्मीबाई देषमुख महिला महाविद्यालय, परळी वै.
Email : rpshahane8869@gmail.com

इ.स.1931 मध्ये महात्मा गांधीना अमेरिकेतील एका प्रमुख वृत्तपत्राने "मॅन ऑफ द इयर" ही उपाधि देऊन त्यांचा गौरव केला यावरून असे दिसते की, गांधीजींचा जागतिक राजकारणाच्या चळवळीवरही फार खोल ठसा उमटला होता. तसेच आधुनिक राजकीय विचार सरणीवरही गांधीजींचे नाव असाधारण स्वरूपाचे



Scanned by CamScanner